**MSEB HOLDING COMPANY LTD**

**महाराष्ट्र शासन उपक्रम (CIN : U40100MH2005SGC153649)**

हाँगकाँग बँक बिल्डींग, ४ था मजला, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई:-४०० ००१

---

दि:- ०२.०८.२०२२

**अधिसूचना**

**विषय:-** महाव्यवस्थापक (वित्त आणि लेखा), सहाय्यक महाव्यवस्थापक (वित्त आणि लेखा), सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) आणि व्यवस्थापक (मासं) या पदांच्या निवड प्रक्रियेच्या परीक्षा केंद्राबाबतची माहिती.

**संदर्भ:-** १) म.रा.वि.मं.सूत्रधारी कंपनी मर्यादित जाहिरात क्र.०१/२०२२.

२) म.रा.वि.मं.सूत्रधारी कंपनी मर्यादित जाहिरात क्र.०२/२०२२.

३) म.रा.वि.मं.सूत्रधारी कंपनी मर्यादित, महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या कंपन्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली अधिसूचना दि.२७.०७.२०२२.

---

१) म.रा.वि.मं.सूत्रधारी कंपनी मर्यादित जाहिरात क्र.०१/२०२२ अन्वये सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) आणि व्यवस्थापक (मासं) तसेच म.रा.वि.मं.सूत्रधारी कंपनी मर्यादित जाहिरात क्र.०२/२०२२ अन्वये महाव्यवस्थापक (वित्त आणि लेखा) आणि सहाय्यक महाव्यवस्थापक (वित्त आणि लेखा) या पदांच्या कागदपत्रे पडताळणीअंती पात्र / अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची यादी उपरोक्त संदर्भ क्र. (३) अन्वये दि.२७.०७.२०२२ रोजी म.रा.वि.मं.सूत्रधारी कंपनी मर्यादित, महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या कंपन्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

२) सदरहू पदांकरीता कागदपत्रे पडताळणीअंती पात्र आढळून येणाऱ्या उमेदवारांनी त्यांच्या अर्जात नोंदविलेल्या नोंदणीकृत ई-मेल आयडीवर निवड चाचणी प्रक्रियेचे प्रवेशपत्र पाठविण्यात आलेले आहे. उमेदवारांनी त्यांना निवड चाचणी प्रक्रियेचे प्रवेशपत्र मिळाले असल्याची खात्री करुन घ्यावी.

३) सदरहू पदांची निवड चाचणी दि.०६ ऑगस्ट २०२२ रोजी ६ वा मजला, प्रकाशगड इमारत, प्रोफेसर अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई:-४०० ०५१ या ठिकाणी पार पाडण्यात येणार असून उमेदवारांनी ठिक सकाळी ०९.०० वाजता निवड चाचणी करीता उक्त ठिकाणी हजर राहणे आवश्यक आहे. उशिराने येणाऱ्या उमेदवारांना निवड चाचणी करीता प्रवेश देण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**"सर्व उमेदवारांना निवड प्रक्रियेकरीता हार्दिक शुभेच्छा"**

०२.०८.२२

मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

म.रा.वि.मं.सूत्रधारी कंपनी मर्यादित

Scanned with CamScanner